

पीएमपीएमएलच्या सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांची पदोन्नती!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 24/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 163 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# नितीन गडकरी यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (हिंद स्वराज्य संघ) वतीने देण्यात येणारा यंदाचा ४३ वा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर झाला आहे. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत पुरस्काराची घोषणा केली.



शुक्रवारी (१ ऑगस्ट) टिळक स्मारक मंदिरात सकाळी १०.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होणार असल्याचे डॉ. टिळक यांनी सांगितले. डॉ. टिळक म्हणाले, 'लोकमान्यांच्या चतुःसूत्रीतील स्वदेशीचा स्वीकार करत गडकरी यांनी रस्त्यांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीत मोठे कार्य सुरू केले आहे. विविध प्रकारच्या वाहन निर्मितीत स्वदेशीचा पुरस्कार व प्रसार त्यांच्याकडून होत आहे. देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांची ४३ व्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.'

यावेळी लोकमान्य टिळक राष्ट्रीय सन्मान देऊन गौरविलेल्या आजवरच्या पुरस्कारार्थींच्या जीवन कार्याचा आढावा घेणारा इंग्रजी ग्रंथ तयार करण्यात आला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, असेही डॉ. टिळक यांनी नमूद केले.

# उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी प्रक्रिया सुरू!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर गृह मंत्रालयाने २२ जुलै २०२५ रोजीच्या राजपत्र अधिसूचनेद्वारे यास अधिकृत मान्यता दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाने घटनेच्या अनुच्छेद ३२४ अंतर्गत उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचे आयोजन करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या निवडणुकीचे आयोजन 'राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणूक कायदा, १९५२' व त्यानुसार तयार करण्यात आलेल्या 'राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निवडणूक नियमावली, १९७४' च्या अधीन राहून केले जाते.

उपराष्ट्रपतीपदाच्या २०२५ मधील निवडणुकीसाठी आयोगाने आवश्यक तयारीस आरंभ केला असून, ही प्रारंभिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच निवडणुकीच्या वेळापत्रकाची अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे.

या निवडणुकीपूर्वी करण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या कार्यवाहीमध्ये लोकसभा व राज्यसभेतील निवडून आलेले आणि नामनिर्देशित सदस्य यांचा समावेश असलेल्या निर्वाचक मंडळाची तयारी, मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नेमणूक आणि पूर्वी झालेल्या सर्व उपराष्ट्रपती निवडणुकांचे संदर्भ साहित्य तयार करणे व प्रसारित करणे या गोष्टींचा समावेश आहे, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महापालिका नोकर भरतीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना न्याय द्या - संदीप वाघेरे

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने माहे ऑगस्ट २०२३ मध्ये सुधारित आकृतीबंध राज्य शासनाकडे पाठविला असून त्यास अद्यापदेखील मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे महापालिकेतील सर्व विभागातील एकूण ४ हजार ७८४ जागा रिक्त आहेत. मागील काही वर्षांमध्ये बीट निरीक्षक व फायरमन व इतर अशा ५३६ जागांची भरती महापालिकेच्या वतीने करण्यात आली होती. परंतु, या प्रक्रियेमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना संधी मिळाल्याचे दिसून येत नाही त्यामुळे महापालिकेच्या वतीने सादर केलेल्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी देत महापालिका नोकर भरतीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्याची मागणी भाजपचे माजी नगरसेवक संदीप वाघेरे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे ई मेल द्वारे केली आहे.



याविषयी अधिक माहिती देताना वाघेरे म्हणाले कि,वास्तविक पाहता पिंपरी चिंचवड शहराच्या विकासामध्ये येथील स्थानिक भूमिपुत्रांनी मोठ्या प्रमाणावर त्याग केलेला आहे, १९६०-७० च्या दशकात औद्योगिक क्षेत्र उभारण्यासाठी एमआयडीसी, लष्कराचे प्रकल्प, मिलेट्री डेअरी फार्म, एच. ए. कंपनी अश्या अनेक प्रकल्पांसाठी शेकडो स्थानिक शेतकऱ्यांनी आपली उपजाऊ शेतीची जमीन सरकारला दिली असून पुणे – मुंबई महामार्ग, पिंपरी इंडस्ट्रियल बेल्ट वाढीसाठी देखील अनेक गावे विस्थापित झाली. पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, निगडी, भोसरी, तळवडे यासारखी अनेक गावे आता शहराचा भाग बनली, पण मूळ रहिवाशांची ओळख धूसर झाली आहे. त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांना नोकऱ्या, उद्योग आणि शिक्षणाच्या कमी संधी मिळाल्या आहेत. रोजगारासाठी अनेकांना हलकी, अस्थायी कामे स्वीकारावी लागत आहेत.

महापालिकेकडे सद्यस्थितीला एकूण ६ हजार ७८४ पदांवर अधिकारी व कर्मचारी कार्यरथ असून ४ हजार ७७६ जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांवर किमान ५० टक्के जागा स्थानिक भूमिपुत्रांसाठी आरक्षित ठेवल्यास स्थानिक भूमिपुत्रांनी शहराच्या विकासासाठी केलेल्या त्यागासाठी त्यांना न्याय मिळणार आहे. आज पिंपरी-चिंचवड हा देशातील एक प्रमुख औद्योगिक शहर म्हणून ओळखला जातो परंतु, यामागे स्थानिकांच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या त्यागाचे पाठबळ आहे. आजपर्यंत सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि संघटनांनी भूमिपुत्र हक्कासाठी लढा दिला, जो आजही सुरू आहे.

पिंपरी चिंचवड शहराचा विकास हा फक्त पायाभूत सुविधा, उद्योगधंदे आणि नागरी विस्तार यापुरताच मर्यादित नाही. तो स्थानिक भूमिपुत्रांच्या त्याग, विस्थापन, आणि सामाजिक बदलांच्या आधारावर उभा राहिलेला आहे. आजही त्यांचा सहभाग आणि सन्मान जपणे ही सामाजिक आणि प्रशासकीय जबाबदारी आहे. आपण महापालिकेच्या वतीने राज्य शासनाकडे पाठविण्यात आलेल्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी देत स्थानिक भूमिपुत्रांना न्याय मिळवून द्यावा अशी आग्रही मागणी वाघेरे यांनी निवेदनामध्ये केली आहे.

# 'डीपी'बाबत नागरिकांचा संभ्रम दूर करा - सुलभा उबाळे

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्याबाबत नागरिकांचा रोष दिसून येत आहे. टाकण्यात आलेली आरक्षणे, रेडझोन हद्द यामुळे मोठा संभ्रम निर्माण झालेला असून याबाबत पक्षाची आणि उद्योग मंत्री म्हणून आपली स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी नागरिकांशी संवाद साधावा अशी मागणी उद्योग मंत्री तथा शिवसेना पुणे जिल्हा संपर्क मंत्री उदय सामंत यांच्याकडे करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या अधिवेशनामध्ये आपण याबाबत स्पष्ट भूमिका मांडलेली आहे मात्र तरीही पिंपरी चिंचवड शहरात प्रत्यक्ष संवाद साधून नागरिकांचा संभ्रम दूर करावा अशी मागणी शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



उद्योग मंत्री तथा शिवसेना पुणे जिल्हा संपर्क मंत्री उदय सामंत यांना शिवसेना उपनेत्या सुलभाउबाळे यांनी निवेदन दिले आहे त्यात त्यांनी म्हटले आहे.पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रासाठी प्रशासनाने नव्याने प्रारूप विकास आराखडा सादर केला.या आराखड्याबाबत नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या होत्या . प्रारूप विकास आराखडा संदर्भात तब्बल 50 हजार नागरिकांनी आपल्या हरकती नोंदविल्या आहे. महापालिकेने टाकलेली विविध आरक्षणे, शेतकऱ्यांच्या जमिनीवर एकाच ठिकाणी बहु आरक्षणे, रेडझोनची हद्द अशा विविध गोष्टींमुळे प्रारूप आराखडा संदर्भात संभ्रम निर्माण झालेला आहे. पिंपरी चिंचवड विकास आराखड्यामध्ये ( डीपी प्लॅन ) शहरातील अनेक नागरिकांचे राहते घर, शेतकऱ्यांच्या जागा बाधित होत असून ह्यामुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही शेतकऱ्यांच्या जमिनीवरती शेजारी शेजारी विविध आरक्षणे पडले असून, त्यामुळे तो शेतकरी भूमिहीन होणार आहे , ह्याबाबत नागरिकांची तीव्र नाराजी आहे.

उबाळे यांनी दिलेल्या निवेदनात असेही म्हटले आहे की प्रारूप विकास आराखड्यामध्ये संपूर्णतः बिल्डर लॉबीचा फायदा बघण्यात आलेला आहे.

हा आराखडा बिल्डर धार्जीना असून, बिल्डर लॉबीला डोळ्यासमोर ठेवून सादर केलेला असल्याचे दिसून येत आहे. ह्या आराखड्याबाबत आतापर्यंत हरकतींचे अर्धशतक नोंदवले गेले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात हरकती पिंपरी चिंचवड मनपाच्या इतिहासामध्ये प्रथमतः च प्राप्त झाल्या आहेत . तसेच काही ठिकाणी रेडझोनची लाल रेषा दाखवण्यात आलेली असून त्याबाबत देखील संभ्रम निर्माण झालेला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकार भवनासाठी स्वतंत्र जागेची मागणी!

»»» | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड शहरात पत्रकार भवन उभारण्यासाठी स्वतंत्र जागेची तरतूद प्रारूप विकास आराखड्यात करण्यात यावी, अशी लेखी सूचना आमदार शंकर जगताप यांनी महापालिका आयुक्तांना केली आहे. या निर्णयामुळे शहरातील पत्रकारांना स्वतंत्र, सुसज्ज आणि हक्काचे व्यासपीठ निर्माण होणार आहे.



मराठी पत्रकार संघाच्या वतीने आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत पत्रकारांचे प्रश्न मांडल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी व मराठी पत्रकार संघाचे शहराध्यक्ष नंदकुमार सातुर्डेकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आमदार जगताप यांची भेट घेऊन पत्रकारांच्या विविध समस्यांबाबत चर्चा केली. यावेळी पत्रकारांच्या प्रश्नांना विधानसभेत वाचा फोडल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ आहेत. त्यांच्या प्रश्नांची मला पूर्ण जाणीव असून त्यांच्या न्याय हक्कांसाठी आपण सदैव पाठीशी राहू, असे आश्वासन आमदार जगताप यांनी दिले. पत्रकारांचा आपल्यावर विश्वास असावा, पण आपण चुकलो तर त्यांनी ती चूक निर्भिडपणे निदर्शनास आणून द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विधानसभेत लक्षवेधी सूचना क्रमांक २४७३ द्वारे आमदार जगताप यांनी पत्रकारांसाठी 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कल्याणकारी महामंडळ' स्थापन करण्याची मागणी केली. यामार्फत पत्रकारांना आरोग्य विमा, अपघात विमा, निवृत्तीवेतन, निवासी सुविधा, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन यांसारख्या अनेक सुविधा मिळाव्यात, अशी स्पष्ट मागणी त्यांनी मांडली.

शंकर जगताप यांनी पत्रकारांच्या हितासाठी शासनाकडे खालील महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत:

- किमान वेतन, सामाजिक सुरक्षा आणि निवासी सुविधा लागू कराव्या.

- पत्रकार, पत्रकारेतर कर्मचारी व मीडिया मालक यांची त्रिसदस्यीय समिती स्थापावी.

- गावपातळीवरील पत्रकारांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी स्वतंत्र केंद्रे उभारावीत.

- माध्यम क्षेत्रात शिस्त राखण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करावी.

त्यांच्या या पुढाकारामुळे पत्रकारांच्या अनेक दीर्घकालीन मागण्या शासन दरबारी पोहोचल्या असून, भविष्यात त्याचा सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.

# महापालिकेच्या मोशी रुग्णालय इमारतीच्या बांधकामाला गती!

»»» | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मोशी येथे ७०० खाटांच्या भव्य रुग्णालय उभारणीच्या प्रकल्पाला वेग आला आहे. डिसेंबर २०२३ मध्ये सुरू झालेल्या या ३४० कोटींच्या प्रकल्पाची उभारणी १५ एकर जागेवर करण्यात येत आहे. यशवंतराव चव्हाण रुग्णालयास सहाय्यक ठरणाऱ्या या प्रकल्पामुळे शहरातील वाढत्या लोकसंख्येला आधुनिक आरोग्य सुविधा मिळणार आहेत. सुमारे ५७,४५० चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्र असलेल्या आणि तळमजला + ८ मजली इमारतीसह उभारल्या जाणाऱ्या या रुग्णालयाचे आराखडे अत्याधुनिक आणि सुसज्ज वैद्यकीय कॅम्पसला दृष्टिक्षेपात ठेऊन तयार करण्यात आले आहेत. यामध्ये भविष्यातील शैक्षणिक व निवासी पायाभूत सुविधांचाही समावेश करण्यात येणार आहे.



सद्यस्थितीत तळमजल्याचे काम पूर्ण झाले असून, तिसऱ्या मजल्यापर्यंतच्या बांधकाम पूर्णत्वाकडे आले आहे. काम नियोजित वेळापत्रकानुसार सुरू असून लवकरच नागरिकांना जागतिक दर्जाचे, रुग्णाभिमुख आणि पर्यावरणस्नेही आरोग्यसेवा अनुभवता येणार आहे.

**रुग्णालयाचे महत्त्वाचे टप्पे -**

खोदकाम व बेसमेंटचे काम १००% पूर्ण सद्यस्थितीत तिसऱ्या मजल्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण
आर्थिक प्रगती: सुमारे १५.८ टक्के
भौतिक प्रगती: ३५ टक्के (तिसऱ्या मजल्यापर्यंतच्या संरचना कामाच्या प्रगतीनुसार) ३६ महिन्यांच्या वेळापत्रकानुसार प्रकल्प प्रगतीपथावर व रुग्णालयाची रचना व सुविधा:

२७४ चारचाकी व २५० दुचाकी वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था आपत्कालीन सेवा, ओपीडी, रेडिओलॉजी, डायग्नोस्टिक, बालरोग, स्त्रीरोग, मानसिक आरोग्य, डे केअर यांसारख्या विभागांचे नियोजन सर्वात वरील मजल्यांवर आयसीयू, डायालिसिस, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, वॉर्ड्स, स्पेशल रूम्स

आठव्या मजल्यावर कर्मचाऱ्यांचे निवास, लेक्चर हॉल व डॉरमिटरीची सुविधा

**हरित व ऊर्जा कार्यक्षम रचना -**

EDGE व IGBC Gold मानांकनासाठी पात्र रचना २०० केएलडी क्षमतेचा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प २०० किलोवॅट क्षमतेचे रूफटॉप सोलर पॅनल्स पावसाळी पाण्याचे संकलन, एलईडी लाईट्स (सेंसरसह), एएसी ब्लॉक बांधकाम, सेंद्रिय कचरा प्रक्रिया यंत्रणा पीएसए ऑक्सिजन जनरेटर व प्न्युमॅटीक ट्युब सिस्टीम (पीटीएस)

अग्निसुरक्षा उपाययोजना: प्री-ॲक्शन सिस्टिम, फायर कर्टन, $CO_2$ सेन्सर्स, स्ट्रेचर रॅम्प्स, सुसंगत आपत्कालीन मार्ग

**भविष्यकालीन नियोजन -**

२०० खाटांचे कर्करोग रुग्णालय १५० विद्यार्थी क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय (पीजी, नर्सिंग, फिजिओथेरपीसह) निवासी इमारतींचे नियोजन

या सर्व सुविधांचे काम पूर्ण झाल्यावर पिंपरी चिंचवड परिसरात सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने रुग्णांना तसेच वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

"पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मोशी येथे उभारले जाणारे ७०० खाटांचे रुग्णालय म्हणजे शहरातील आरोग्य क्षेत्रातील एक ऐतिहासिक पाऊल आहे. वाढत्या लोकसंख्येला आधुनिक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा आमचा संकल्प आहे. वैद्यकीय शिक्षण, आपत्कालीन सेवा आणि पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा यांचा समन्वय साधत हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे."

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 24/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पीएमपीएमएलच्या सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांची पदोन्नती!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर चंद्रभागा पांडुरंग जगताप यांच्या पुढाकाराने पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांसाठी अनेक महत्त्वपूर्ण विषयांबाबत बैठकीत चर्चा झाली त्या अनुषंगाने सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीपासून ते सातव्या वेतन आयोगाच्या हप्त्यांपर्यंत, तसेच सेवा उपदान (ग्रॅज्युईटी) रक्कम वाढवण्यापर्यंत विविध मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा होऊन अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या निर्णयांबाबत प्रशासनिक तोडगा काढण्यात यश आले.**




पीएमपीएमएलमध्ये चेकर पदासाठी यापूर्वी १०वी नापास कर्मचाऱ्यांनाही सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात आली होती. मात्र अलीकडील पदोन्नतीमध्ये केवळ १०वी उत्तीर्ण कर्मचाऱ्यांनाच संधी देण्यात आली. या निर्णयामुळे नाराजी निर्माण झाली होती. यावर आमदार शंकर जगताप यांनी स्पष्टपणे मागणी केली की, "पूर्व धोरणाप्रमाणे सर्व सेवाज्येष्ठ कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळावी," आणि यावर सकारात्मक निर्णय घेण्यात आला. सातव्या वेतन आयोगाचा दुसरा हप्ता गणेशोत्सवापूर्वी कर्मचाऱ्यांना दिलासा देणारा आणखी एक निर्णय म्हणजे सातव्या वेतन आयोगाचा दुसरा हप्ता गणपती सणापूर्वी दिला जाणार आहे. यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना राज्याच्या सण असलेल्या गणेशोत्सवाच्या काळात आर्थिक हातभार लावण्यास मदत होणार आहे.राज्य शासनाच्या नियमानुसार १४ लाख रुपयांपर्यंतच सेवा उपदान (ग्रॅज्युईटी) मिळते. मात्र ती मर्यादा २० लाखांपर्यंत वाढवावी, अशी ठोस मागणी आमदार शंकर जगताप यांनी केली असून, याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. वित्त विभागाकडून माहिती आल्यानंतर यावर अंतिम निर्णय होणार आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना तत्काळ ग्रॅज्युईटी मिळण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दोन्ही महापालिका आयुक्त यांची संयुक्त बैठक लावून सक्षम यंत्रणा उभारण्याची ग्वाही देण्यात आली. वर्तमान व्यवस्थेनुसार सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना फक्त २ लाख रुपये तात्काळ दिले जातात आणि उर्वरित रक्कम वर्षभरानंतर. या उशिरामुळे अनेक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे आमदार जगताप यांनी स्पष्ट सूचना दिल्या की, "ग्रॅज्युईटीची रक्कम लवकरात लवकर मिळावी यासाठी दोन्ही महापालिका आयुक्त आणि व्यवस्थापकीय संचालकांसोबत बैठक घेऊन त्वरित निर्णय घ्यावा."

शहरातील वाढत्या लोकसंख्येला आणि वाहतुकीच्या गरजेला लक्षात घेता पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत नवीन बस डेपो उभारण्याबाबत आग्रहाची मागणी करण्यात येऊन त्यासाठी पीएमआरडीए व पीसीएमसीच्या हद्दीतील जागा आरक्षित करून ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे, नवीन एसी आणि नॉन-एसी बसेस शहरात सुरू करण्याबाबतही निर्णय घेण्यात आला. खास बाब म्हणजे, खाजगी ठेकेदारांच्या ऐवजी पीएमपीएमएलने स्वतःच्या मालकीच्या बसेसची संख्या वाढवावी, याबाबत आमदार जगताप यांनी सीएमडी पंकज देवरे यांच्यासोबत थेट चर्चा केली.

आमदार शंकर जगताप यांनी सांगितले की, "पीएमपीएमएलमधील हजारो कर्मचाऱ्यांच्या अडचणी दूर व्हाव्यात, त्यांना न्याय मिळावा, आणि नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक वाहतूक सेवा मिळावी, हा आमचा प्रमुख हेतू आहे. मी या सगळ्या निर्णयांसाठी पाठपुरावा करणारच, पण त्यांच्या अंमलबजावणीसाठीही कटिबद्ध आहे."

या महत्त्वपूर्ण बैठकीस व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे, सह-संचालक नार्वेकर, वित्त अधिकारी योगेश होले, वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे,व इतर अधिकारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात २२ जुलै रोजी आयोजित ३० भव्य महा रक्तदान शिबिरांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भाजप शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. काटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या शिबिरांमधून एकूण २३२१ रक्त पिशव्यांचे विक्रमी संकलन करण्यात आले.**

आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विविध ठिकाणी रक्तदान शिबीरे घेण्यात आली. यावेळी माजी आमदार श्रीमती अश्विनीताई जगताप, दक्षिण आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, भाजपा सरचिटणीस विजय शिंदे, अजय पताडे, महिला शहराध्यक्ष सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, मंडल अध्यक्ष मोहन राऊत, हर्षद नढे, सोमनाथ तापकीर, गणेश ढोरे, सनी बारणे, जयदीप खापरे, धरम वाघमारे, मंगेश धाडगे, अनिता वाळुंजकर, रामदास कुटे, ऍड.योगेश सोनवणे, शिवराज लांडगे, अमोल डोळस, अजित बुर्डे यांच्यासह स्थानिक नगरसेवक, भाजप पदाधिकारी, विविध प्रकोष्ठ प्रमुख उपस्थित होते.




काटे यांनी शहरातील नागरिकांना आणि युवकांना या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग घेण्याचे आवाहन केले होते आणि त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. या शिबिरांमध्ये महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक अशा समाजातील सर्वच स्तरांतील लोकांनी उत्साहाने सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले.

ही रक्तदान शिबिरे चिंचवड, पिंपरी आणि भोसरी विधानसभा क्षेत्रातील विविध प्रमुख ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये रावेत - वाल्हेकर वाडी, चिंचवड, काळेवाडी, थेरगाव - वाकड, थेरगाव चौक, रहाटणी - पिंपळे सौदागर, रहाटणी, सांगवी - पिंपळे गुरव, पिंपळे गुरव, प्राधिकरण - चिंचवड, आकुर्डी गाव - शाहू नगर, सं.तु.नगर - खराळवाडी - कासारवाडी, फुगेवाडी - दापोडी - बोपखेल, चिखली - कृष्णानगर, रुपीनगर, तळवडे - यमुनानगर, मोशी - चहोली, चहोली बुद्रुक, दिघी - गवळीनगर गव्हाणे वस्ती, लांडगे वस्ती आणि मोशी प्राधिकरण, नेहरूनगर या ठिकाणांचा समावेश होता. तिन्ही विधानसभा संघातील भारतीय जनता पार्टी मंडल अध्यक्ष, विविध पदाधिकारी तसेच अन्य सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी झाला.

यावेळी बोलताना, शत्रुघ्न काटे यांनी "रक्तदान हीच खरी समाजसेवा असून, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या समाजाभिमुख कार्याला मानवंदना म्हणून आपण सर्वांनी या उपक्रमात सहभागी व्हावे. प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे, आणि प्रत्येक रक्तदाता ही प्रेरणा आहे!" असे आवाहन पिंपरी चिंचवड शहरवासियांना केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. यामध्ये विशेषतः तरुणाईचा सहभाग लक्षणीय होता, तर महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनीही मागे न राहता या सामाजिक कार्यात सक्रिय योगदान दिले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968